# पोलिस महिला तक्रारदारांशी वागताना सौजन्य व संवेदनशीलता दाखवतात का?

प्रवीण दीक्षित,
माजी पोलीस महासंचालक,
महाराष्ट्र

# महिलांचे विविध प्रकार

- महिला तक्रारदार

- महिला आरोपी

- महिला पोलीस अधिकारी
- ह्यांच्याशी वागताना पोलीसांची 1) वागणूक व दृष्टिकोन 2) कौशल्ये,व 3) ज्ञान कसे असावे, ह्याचा विचार होणे महत्त्वाचे आहे.

# महिला तक्रारदार

- आपण अत्याचाराचे बळी आहोत हे सांगताना वाटणाऱ्या अपराधीपणाने , लोकलज्जेस्तव महिला त्या विरुद्ध तक्रार करायला धजावत नाहीत व त्या कायदेशीररीत्या  आपल्याला न्याय कसा मिळवता येईल ह्या बाबत अनभिज्ञ असतात.
- त्यामुळे पोलिसांचे कर्तव्य आहे की
  - समाजात स्त्रियांविरुद्ध गुन्ह्यांबाबत जागरूकता निर्माण करणे
  - हे गुन्हे होणार नाहीत ह्यासाठी  सक्रीय प्रयत्न करणे
  - ह्या गुन्हयांतील आरोपी शोधून काढणे  व तपास करून न्यायालयात सादर करणे
- पोलीस सर्वप्रथम कारवाई करणारे , तपास करणारे, किंवा ठाणे अंमलदार
- असू शकतात.

# पोलिसांची वागणूक कशी असावी ?

- योग्य वागणूकीत पुढील गोष्टींचा समर्पक वापर अपेक्षित आहेः
    - तपास करण्याची उत्तम माहिती
    - व्यवसाय कौशल्य व
    - वागणुक व दृष्टिकोन
- ज्ञानामधे पुढिल गोष्टी अपेक्षित आहेत
    - पीडिते बद्दल संवेदनशीलता
    - विशिष्ट गुन्ह्यांत लागू करायचे कायदे
    - त्या गुन्ह्यांचा तपास करायची पद्धत
    - पीडित व  साक्षीदारांना संरक्षण
    - गुन्ह्यांचे न्यायालयासमोर योग्य सादरीकरण करणे

# कौशल्ये

- कौशल्यात पुढील गोष्टी अपेक्षित आहेतः;
  - भरभक्कम पुरावा गोळा करणे
  - गुन्ह्यांचा तपास करणे
  - पीडितेला वेळेवर व उचित नुकसान भरपाई मिळवून देणे
  - पीडितेचे पुनर्वसन करणे.

# वागणूक व दृष्टिकोन

- दृष्टिकोन वागणुकीतून स्पष्ट होतो
- दृष्टिकोन पुढील प्रकारे बदलता येतोः
  - परिणाम कारक सल्ला देणे
  - कामात मार्गदर्शन करणे
  - प्रशिक्षण
  - दृष्टिकोनात बदल करण्याच्या उपाय योजना करणे

- दृष्टिकोन म्हणजे जाणीवपूर्वक  घडणाऱ्या गोष्टी, माणसे, वस्तू, घटना  ह्यांच्या बाबत  सकारात्मकतेने किंवा नकारात्मकतेने  विचार करणे.

# पोलीस प्रशिक्षणाची भूमिका

- पोलीस प्रशिक्षणात ज्ञान व कौशल्ये  शिकवण्यावर भर दिला जातो.

गरज आहे ती प्रशिक्षणात आमूलाग्र बदल करून  वागणूक व दृष्टिकोन बदलण्यावर भर देण्याची व ते सकारात्मक करण्याची

- महिला तक्रारदार पोलीस ठाण्यात येते  तेव्हा पोलिस तिच्याशी कसे वागतात त्याप्रमाणे ती किती सहकार्य काणार  किंवा काय प्रतिक्रिया देणार हे ठरत असते.

# कोणती खबरदारी घेणे आवशयक आहे?

- पोलीस ठाण्यात महिला तक्रारदार येते, त्या वेळेस तिला सर्व प्रथम कोण भेटते
- तिची तक्रार लिहून घेण्यास किती वेळ लागतो?
- तक्रार ती सांगते त्या प्रमाणे लिहिली जाते की तक्रारीचे गांभीर्य कमी करून लिहिली जाते?
- तक्रार ती सांगते त्या भाषेत व शब्दात लिहिली जाते का?
- तक्रार लिहून घेताना दृक् श्राव्य माध्यमाचा वापर केला जातो का?
- तक्रार घेताना लाच मागितली गेली होती का?
- वरिष्ठ अधिकाऱ्याने नंतर वरील गोष्टी तक्रारदाराशी संपर्क करून तपासून पाहिल्या का व तशी नोंद ठेवली का?

# महिला तक्रारदारांशी वागताना संवेदनाहीनतेची उदाहरणे

- घरगुती भांडणाची गुन्हा म्हणून नोंद घेण्यास टाळाटाळ करणे
- सौम्य शिक्षा असेल अशी कलमे लावून गुन्हा नोंदवणे
- लग्नापूर्वी गर्भारशी राहण्यास फक्त महिलेलाच जबाबदार ठरवणे
- मुलींची टिंगल  टवाळी होत असेल तर त्यास मुलींचे उत्तान कपडे कारण  आहेत असे समजणे व गुन्हे दाखल करण्यास नकार देणे
- बलात्काराने पीडित माहिलेची चारित्र्यहीन म्हणत थट्टा करणे
- हुंड्याच्या त्रासाने गांजलेल्या महिला तक्रारदारास भांडखोर ठरवणे

# संवेदनाहीनते ची काही उदाहरणे

- किशोरवयीन मुलीवर बलात्कार झाल्यास आई ने नीट संस्कार न केल्याने म्हणत आईला जबाबदार ठरवणे
- नवऱ्याने परस्त्रीबरोबर संबंध ठेवल्यास आधुनिककाळात हे चालतेचअसा आव आणणे व गुह्ना दाखल न करणे
- वारंवार तक्रार करायला येणाऱ्या महिलेस `वेडे’ ठरवणे
- (डॉ. पूर्णिमा अडवाणी , राष्ट्रीय महिला आयोगाच्या सदस्या ह्यांच्या लेखातून )

# आरोपी महिला

- विविध गुन्ह्यांमधे आरोपी असणाऱ्या महिलांच्या संख्ये मधे  दिवसेंदिवस वाढ होत आहे.
- संघटित गुन्ह्यांमधे, माफिया कारवायांत, दहशतवादी कारवायांत, गुप्तहेर म्हणून, देशविघातक नक्षल कारवायांत, पांढरपेशी आर्थिक गुन्ह्यात, पारंपारिक गुन्ह्यांत, जसे चोऱ्या दरोडे, सोन साखळीच्या चोऱ्या ह्यात अनेक महिला आढळून येतात. तसेच सायबर गुन्हे, राजकीय गुन्हे यातही महिला आहेत.
- कोठडीतील महिलांची सुरक्षा अत्यंत महत्वाची आहे. कोठडीतील महिलेवर बलात्कार हेअत्यंत घृणास्पद कृत्य आहे व त्यासाठी कठोर शिक्षा व नोकरीतून वेगळी बडतर्फीची शिक्षा सुनावली जाते.

# महिला पोलीस अधिकारी

- महिला पोलीस अधिकाऱ्यांशी सौजन्याने वागणे आवश्यक आहे.
- महिलांविरुद्ध लैंगिक अत्याचारांची निःपक्ष तातडीने चौकशी गरजेची आहे.
- महिलांसाठीच्या राखीव जागा भरण्यासााठी  कसोशीने प्रयत्न आवश्यक आहेत.
- हुषार महिलांना, फौजदार, उप अधीक्षक व IPS   साठी प्रोतसाहन देणे गरजेचे आहे.
- महिला पोलीस अधिकाऱ्यांना पोलीस ठाणे प्रभारी म्हणून काम देउन नेतृत्व गुणाला वाव देण्याची गरज आहे.
- पोलीस ठाण्यात महिलांसाठी स्वच्छ प्रसाधन गृहे, कपडे बदलण्यासाठी जागा, पाळणाघरे ह्या सोयी आवश्यक आहेत.

# संदर्भ

- मानवी हक्क संरक्षण व संवर्धन, लेखक प्रवीण दीक्षित, यशदा तर्फे प्रकाशित
- Women's Safety and Security

  A Handbook for First Responders and Investigators in the Police

  By BPR& D, New Delhi

# धन्यवाद.